दै. देशोन्नती दि. 02/12/2022

# उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांसह पथकाची चौपाटी भागातील जुगार अड्ड्यावर धाड

## अवैध धंदे चालकांचे धाबे दणाणले



देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिमायतनगर** ■ शहरातील पोस्ट ऑफिसच्या शेजारीच जुगार अड्डे चालु असल्याची गोपनिय माहिती भोकरच्या डीवायएसपी यांना कळताच त्यांनी आपल्या पथकांना सोबत घेऊन धाड टाकुन रोख रक्कम ७४६० रुपये, जुगाराचे साहित्य. आणि दोघांना ताब्यात घेतले असुन आठ ते दहा जण फरार झाले आहेत. धाड सत्रात कितीही रक्कम मिळो परंतु शहरात अलिकडच्या काळात डीवायएसपीने आपल्या पथकांच सोबत स्वतः राहुन धाड टाकण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्यांच्या कर्तबगारीमुळे शहरातील जनतेतुन कौतुकाचा वर्षाव होत आहे.

भोकरचे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणुन प्रशिक्षणार्थी अतिरिक्त पोलीस अधिक्षक शफक्त आमना यांनी पदभार घेताच शहरातील मटका जुगार अड्ड्याला अक्षरशः कुलूप आपोआप लागल्याचे चित्र काही दिवस दिसत होते. पुन्हा हळुहळु लपुन- छपुन या धंद्यांनी नव्या जोमाने हे धंदे सुरु करण्यास सुरुवात केल्याची गोपनिय खबर भोकरच्या उपविभागीय पोलिस अधिकारी यांना कळताच त्यांनी १ डिसेंबर रोजी स्वतःसह आपल्या पथकांना सोबत घेऊन अक्षरक्षः तिर्रट नावाच्या जुगार अड्ड्यावर धाड टाकताच सात- आठ जण फरार झाले तर शेख गुडू शेख साजीद, सुरज महावीर ठाकुर या दोघांसह पथकांनी रोख ७ हजार ४६० रुपये, दोन लाकडी बॉक्स, पत्ते, ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्या पथकात भोकर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे बालाजी उमीनवाड, शाहु, कदम त्यांचे अंगरक्षक सहभागी होते. धाडसत्र सुरु झाल्यांनतर स्थानिकचे पोलीस आल्याचे वृत्त आहे.


उमलती फुले

बाराव्या वाढदिवसाच्या शुभेच्छा



चि. श्रीनिवास नामदेव श्रीमंगले

रा. कामजळगा, ता. मुखेड, जि. नांदेड